जळगाव तरुण भारत
Main Edition | 2023-10-15 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com



# शासकीय तंत्रनिकेतनमध्ये सायबर सिक्युरिटीवर जनजागृतीपर मार्गदर्शन

**जळगाव :** शासकीय तंत्रनिकेतन मधील माहिती व तंत्रज्ञान विभागात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र सायबर सेल व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या सहकार्याने सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृतीपर कार्यशाळा घेण्यात आली.

विद्यापीठातील संगणक विभागाच्या एम.सी.ए.च्या निकिता लोहार, दर्शन नेवे या विद्यार्थ्यांनी विद्यालयात सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. सायबर गुन्ह्यापासून तसेच त्याद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासंबंधी विस्तृत माहिती दिली. मोबाईलच्या माध्यमातून विविध ॲप, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्रामयाचे फायदे व तोटे या विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी प्रभारी उपप्राचार्य डॉ. पी. पी.चौधरी, प्रा. शेळके, हर्षल नेमाडे, जे. पी. जोशी, सायबरसेल पोलिस सचिन सोनवणे व संजय नन्नावरे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शुभांगी किरंगे यांनी केले .

Powered by iDocuments